# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टॉवर्स,
नरीमन पॉईंट,
मुंबई — ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एसटीडी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

क्र. मजीप्रा / सस / तांशा १ / 652 /

दिनांक २८.२.२००१

**-: प रि प त्र क :-**

क्र. ६६

विषय :- कार्यकारी अभियंता यांनी , झालेल्या कामावर ५ टक्के तपासणी देणेबाबत .

संदर्भ :- १) अधीक्षक अभियंता (मुख्यालय ) यांचे परिपत्रक क्र. एमआयएस / १०९० / सीआर - ५८० / पीबीयु - ३ दिनांक १६.७.९०
२) वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांचे परिपत्रक क्र. ११४२ दि. १९.१०.९२.
३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. ८, पत्र क्र. एमजीपी एमएस टीएस - १ / ३५० / ३७५ दि.५.२.९९.

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकांन्वये, क्षेत्रीय कार्यकारी अभियंता यांनी झालेल्या कामावर कमीत कमी ५ टक्के तपासणी देणे आवश्यक आहे असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे, असे असतानाही, या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही कार्यकारी अभियंते झालेल्या कामावर टक्केवारी तपासणी मुळीच देत नाहीत, तर काही कार्यकारी अभियंते हे ५ टक्क्यापेक्षा कमी रकमेसाठी टक्केवारी तपासणी देतात ब-याच प्रकरणी असेही आढळले आहे की, जी टक्केवारी तपासणी दिलेली आहे ती, दडलेल्या बाबींवर (hidden measurements ) न देता पुरवठा केलेल्या साहित्यावर दिली जाते ही बाब चुकीची आहे .

वास्तविक , उपरोक्त संदर्भिय परिपत्रक क्र. १ व ३ अन्वये असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, कार्यकारी अभियंता यांनी जी टक्केवारी तपासणी द्यावयाची आहे ती , दडलेल्या बाबींवरच उदा. पाईपलाईनचे चर, पुरवठा विहीर, पायाची खोली ,सलोह कॉक्रीटचे कामात टाकलेल्या सळया , व पाईपलाइन टाकणे इत्यादी बाबीवर देणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी ही टक्केवारी तपासणी चालू अथवा अंतिम देयक अदा करणेपूर्वीच देणे बंधनकारक आहे . तसेच ही बाब महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम संहितेच्या परिशिष्ट २४ मध्येही स्पष्टपणे नमूद केलेली आहे .

उपरोक्त बाबींची पूर्तता कार्यकारी अभियंता यांनी केलेली नसल्यास विभागीय लेखापालांनी त्यांच्या निदर्शनास आणून द्यावी . याउपरही कार्यकारी अभियंता यांनी त्याचे उल्लंघन केल्यास, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम संहितेच्या परिच्छेद क्र.४.२.३ प्रमाणे विभागीय लेखापालानी हरकतीच्या नोंदवहीत त्याची नोंद करुन ही बाब थेट संबधित अधीक्षक अभियंता व वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना कळवावी . विभागीय लेखापालानी सदर बाब संबधितांच्या लक्षात आणून न दिल्यास त्यांनाही वैयक्तिकरित्या जबाबदार धरण्यात येईल असे संदर्भिय परिपत्रक क्र. २ नुसार यापूर्वीच निदर्शनास आणून देण्यात आलेले आहे .

या परिपत्रकान्वये पुन्हा एकदा सर्व कार्यकारी अभियंता व विभागीय लेखापालांच्या असे निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, उपरोक्त नियमांचे उल्लंघन झाल्यास त्याबाबत संबंधितांना व्यक्तिशः जबाबदार धरण्यात येऊन त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई केली जाईल .

(राजेंद्र सगणे )
सदस्य सचिव (तांत्रिक )

प्रत :

सदस्य सचिव (प्रशासन व अस्थापना ), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , मुंबई .

मुख्य अभियंता व विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , नवी मुंबई .

मुख्य अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , ठाणे / पुणे / औरंगाबाद / अमरावती / नाशिक / नागपूर .

वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , नवी मुंबई .

सर्व अधीक्षक अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण .

सर्व कार्यकारी अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सर्व विभागीय लेखापाल ,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण .

G/EST/February २८, २००१

M. J. P.
ISSUED
1/3/2001
1 MAR 2001
MUMBAI - 21